**CHRIST CHURCH SCHOOL**

## Essay Writing Ans.Key

**Name:________________________________** **Roll No:____**

**Sub:Marathi** **Date:_______**

**Std:IV A,B,C,D.E,F,G**

## विषयः निबंध लेखन

### प्र.१ माझा आवडता नेता हया विषयावर निबंध लिहा.

### १. गांधीजी

भारताला स्वतंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक महान स्त्री व पुरूषांनी आपले प्राण दिले. अशा महापुरूषांपैकी एक होते महात्मा गांधी. महात्माजींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद्र गांधी. महात्मा गांधी युगपुरूष होते. २ ऑक्टोबर १८६९ ला काठेवाडमध्ये पोरबंदर येथे त्यांचा जन्म झाला.

सत्य आणि अहिंसेचा मार्ग वापरून भारताला स्वतंत्र्य मिळवून देण्याचे महान कार्य गांधीजीनी केले. गांधीजी स्वतःला नेहमी एक सामान्य माणूस मानत असत. बापूजींची १९२0 ची

असहकार चळवळ १९३0 ची दांडी यात्रा व १९४२ चा चले जाव लढा हे स्वतंत्र्य आंदोलनामधील सोनेरी क्षण होते.

असे हे महात्मा गांधी मला फार आवडतात.

# २ .लोकमान्य टिळक

टिळकांचाजन्म २३जुलै इ.स.१८५६ मध्ये रत्नागिरीमधील एका मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील चिखलगाव हे त्यांचे मूळ गाव होय. लोकमान्य टिळकांच्या पत्नी सत्यभामाबाई उर्फ तापीबाई .

इ.स. १८९७ साली महाराष्ट्रात गाठीच्या प्लेगची साथ आली. बाळ गंगाधर टिळक यांनी मराठी पत्रकारितेत मोठे योगदान दिले. तथापि, त्यांनी पुण्यातील प्लेगच्या साथीच्या काळात घेतलेली भूमिका महत्वपूर्ण ठरली **१ जानेवारी १८८०** रोजी न्यू **इंग्लिश स्कूलची** स्थापना झाली. टिळकांनी विनावेतन शिक्षकी पेशा पत्करला. विष्णुशास्त्री १८८२ मध्ये मरण पावले तथापि **१८८४** मध्ये वेडरबर्न, वर्ड्स्वर्थ, मंडलिक, तेलंग, दांडेकर, य.मो. केळकर, भांडारकर वगैरे प्रभृतींच्या मदतीने टिळक–आगरकरांनी **डेक्कन एज्युकेशन सोसायटीची** स्थापना केली आणि या संस्थेतर्फे **१८८५** मध्ये **फर्ग्युसन महाविद्यालयाची** स्थापना करण्यात आली. टिळक **गणित व संस्कृत** विषय शिकवीत.

टिळकांनी इतर सहकाऱ्यांच्या मदतीने इ.स. १८८१ साली केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरू केली. यापैकी केसरी हे मराठीतून प्रसिद्ध होत होते तर मराठा हे

इंग्रजीमधून. प्रारंभी आगरकर केसरीचे व टिळक मराठा चे संपादक होते.. इ.स. १८८२च्या अखेरीस केसरी हे भारतातील सर्वाधिक खप असलेले प्रादेशिक वर्तमानपत्र बनले.

असे हे लोकमान्य टिळक मला फार आवडतात .